जा.क्र. ६६५६/१९
धर्मादाय आयुक्त भवन
३ रा मजला,८३, डॉ.ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्र. २४९३५४३४ २४९३५४९०
दिनांक - 24 SEP 2019

**परिपत्रक क्र. ५६६ दिनांक २४.०९.२०१९**

पहा परिपत्रक क्र.५४६, दि.१९/०७/२०१८

उपरोक्त परिपत्रकानुसार राज्यातील धर्मादाय रुग्णालयांना त्यांच्या नावामध्ये अथवा नावासमोर "धर्मादाय अथवा चॅरीटेबल" हा शब्द नमूद करण्यास व तसे प्रसिद्ध करण्यास आदेशित केलेले आहे. मात्र काही धर्मादाय रुग्णालये "धर्मादाय अथवा चॅरीटेबल" असा त्यांच्या नावातील उल्लेख लहान अक्षरात **वा न दिसणारे स्टिकर्स** या स्वरुपात करत असल्याचे दिसून येते. त्याअनुषंगाने सेवाभावी संस्था वनागरीकांकडून तक्रारी प्राप्त होत आहेत. तरी याबाबत एकसूत्रता राहण्यासाठी धर्मादाय रुग्णालयाच्या नावातील "धर्मादाय अथवा चॅरीटेबल" हा शब्द किमान २" X ४" इतक्या आकाराचा पेंट करून वा **रुग्णालयाच्या नावाच्या समप्रमाणात कायमस्वरूपी राहील** असा लावणे आवश्यक आहे जेणेकरून सर्व सामान्य नागरिकांना तो स्पष्टपणे दिसेल.

**तरी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना असे निर्देशित करण्यात येते की**, आपले अधिनस्त धर्मादाय रुग्णालयांना त्यांच्या नावामधील "धर्मादाय वा चॅरीटेबल" हा शब्द सर्व सामान्य नागरिकांना तो स्पष्टपणे दिसण्यासाठी वरीलप्रमाणे सूचना देण्यात याव्यात. सदर सुधारणा हे परिपत्रक निर्गमित केल्यापासून एक महिन्याच्या आत करण्यात याव्यात व त्यानुसार धर्मादाय रुग्णालयांनी केलेल्या कार्यपुर्ततेबाबत मुख्यालयास अवगत करावे.

24-9-19

(संजय ग. मेहरे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
५. अधिक्षक (रुग्णालय शाखा / आस्थापना शाखा), मुख्यालय
६.संगणक शाखा, मुख्यालय (प्रत वेबसाईटवर अपलोड कण्यासाठी)